## जिल्हा व्यवस्थापन मंडळ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र,उस्मानाबाद या समितीच्या दिनांक-06/06/2023 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

जिल्हा व्यवस्थापन मंडळ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र,उस्मानाबाद या समितीची बैठक मा.अध्यक्ष, जिल्हा व्यवस्थापन मंडळ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र तथा जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 06/06/2023 रोजी दुपारी 12 . 30 वाजता आयोजित करणेत आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | मा. डॉ. सचिन ओम्बासे (भा.प्र.से.) | मा.अध्यक्ष,जिल्हा व्यवस्थापन मंडळ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र तथा जिल्हाधिकारी,उस्मानाबाद |
| 3 | मा. सुरेकांत मुजबळ | सचिव तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद. |
| 4 | डॉ. गलांडे आर.व्ही. | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय उस्मानाबाद. |
| 5 | श्री.फाटक एस. यु. | उप.शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद उस्मानाबाद |
| 6 | डॉ.शिवकुमार हालकुडे | सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद |
| 7 | श्री. काझी.टी.एम. | (प्रतिनिधी)शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद उस्मानाबाद |
| 8 | श्री. श्रीहरी सोळंके | सा.संचालक,जिल्हा कौशल्य विकास रोजगार मार्गदर्शन केंद्र |
| 9 | श्री. बेग पि.के. | वसुली निरीक्षक, दिव्यांग महामंडळ उस्मानाबाद |
| 10 | श्री.वीर एस.बी. | जिल्हा समन्वयक शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद |
| 11 | श्री.शिंदे के.बी | सामान्य प्रशासन अधिकारी नगर परिषद परांडा |
| 12 | श्री.डॉ.शिवकुमार हालकुडे | अति.जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.उस्मानाबाद |
| 13 | श्री.गिरीश पंडित | मुख्याधिकारी नगर परिषद वाशी |
| 14 | श्री. कांबळे बी.डी. | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता समाज कल्याण विभाग जि. प. उ,बाद |
| 15 | श्री.अंकुश गणपतराव पांढरे | संस्था प्रतिनिधी |
| 16 | श्री.बसवेश्वर पैके | व्यवस्थापक डी.डी.आर.सी विठाई जनसेवा संस्था, |
| 17 | श्री.विजय कान्हेकर | संस्था प्रतिनिधी महात्मा गांधी सेवा संघ |
| 18 | श्री.विष्णु रामभाऊ वैरागड | संस्था प्रतिनिधी परभणी जिल्हा दिव्यांग क्रीडा असोसिएशन परभणी |
| 19 | सौ.सपना चिट्टे | संस्था प्रतिनिधी सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती सोलापूर |
| 20 | श्री.उमाप ए.एस. | संस्था प्रतिनिधी |

मा.अध्यक्ष, जिल्हा व्यवस्थापन मंडळ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र,उस्मानाबाद यांचे परवानगीने सचिव तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

**1.मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे:-** सचिव तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी जिल्हा व्यवस्थापन मंडळ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, उस्मानाबाद या समितीची पहिलीच बैठक असल्याचे नमुद करुन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रामार्फत दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण पुनर्वसनाच्या दृष्टिने जनजागृती, सर्वेक्षण, लवकर निदान सल्ला व मार्गदर्शन,दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव साधने,दिव्यांग व्यक्तीकरीता शारिरीक व्यंग शस्त्रक्रिया,दिव्यांगत्वाचे दाखले देणेकरीता शिबीरांचे आयोजन करणे तसेच शिक्षण व प्रशिक्षण नोकरी इत्यादी सेवा पुरविणेच्या दृष्टिने हे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र कार्य करणार असल्याचे बैठकीमध्ये सांगण्यात आले.

**2. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राकरीता स्वयंसेवी संस्थेची निवड करणे:-** जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्याकरीता (1) विठाई- जनसेवा संस्था, हरंगुळ(बु.)ता.जि.लातूर,(2) तुळजाई प्रतिष्ठाण बहु. संस्था,

Scanned with OKEN Scanner

पानगाव, ता.कळंब,जि.उस्मानाबाद,(3)श्री.गुरुदत्त बहुउद्येशिय संस्था (क.) तडवळे, ता.जि.उस्मानाबाद (4) सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती सोलापूर (5) महात्मा गांधी सेवा संघ औरंगाबाद (6) परभणी जिल्हा दिव्यांग क्रीडा असोसिएशन परभणी या संस्थेचा प्रस्ताव प्राप्त झालेले असल्याचे व त्यांना सादरीकरणसाठी बैठकीमध्ये बोलविण्यात आले असल्याचे सचिव तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि. प. यांनी बैठकीमध्ये सांगितले त्यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी स्वयंसेवी संस्थेच्या कागदपत्राबाबत काही अडचणी असतील तर त्या आजच सादर करा असे सुचित केले. प्राप्त प्रस्तावाच्या क्रमांकानुसार खालील संस्थांनी सादरीकरण केले ते पुढील प्रमाणे

| अ.क्र. | संस्थे नांव | संस्थेनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्राप्र गुण | सादरीकरणाचे गुण | एकुण गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | विठाई जनसेवा संस्था, हरंगुळ(बु.) ता.जि.लातूर | 10 | 5 | 15 |
| 2 | तुळजाई प्रतिष्ठाण बहु. संस्था, पानगांव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | 33.2 | गैरहजर | 33.2 |
| 3 | श्री.गुरुदत्त बहुउद्येशिय संस्था (क.) तडवळे, ता.जि.उस्मानाबाद | 8.2 | गैरहजर | 8.2 |
| 4 | सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती सोलापूर | 23 | 10 | 33 |
| 5 | महात्मा गांधी सेवा संघ औरंगाबाद | 50 | 17 | 67 |
| 6 | परभणी जिल्हा दिव्यांग क्रीडा असोसिएशन परभणी | 20 | 10 | 30 |

वरील संस्थापैकी महात्मा गांधी सेवा संघ,औरंगाबाद यांना सर्वाधिक म्हणजे 67 गुण मिळालेले आहेत.

जिल्हा व्यवस्थापन मंडळ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र उस्मानाबाद येथील बैठकीमध्ये उपस्थित असणा-या संस्था प्रतिनिधीसमोर त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये काही कमी कागदपत्रे असतील तर त्यांनी आजच सादर करावेत व काही आक्षेप असतील तर 7 दिवसाची मुदत देण्यात यावी असे निर्देश मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी महोदय यांनी दिले.उपस्थित असलेल्या सर्व संस्था प्रतिनिधीच्या समोर त्यांचे प्रस्ताव ठेवून कमी असलेल्या व गुण न मिळालेल्या कागदपत्राची पुर्तता करून घेण्यात आली व शंका असलेल्या बाबतीत मुदानिहाय त्यांचे निराकरण करण्यात आले त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर समाधान झालेनंतरच त्यांच्या संस्थेला किती गुण प्राप्त झालेले आहेत याची माहिती देवून सभेचे सचिव तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. सुर्यकांत भुजबळ यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थित सर्व सदस्यांचे आभार माणून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव
जिल्हा व्यवस्थापन मंडळ
जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,उस्मानाबाद

अध्यक्ष
जिल्हा व्यवस्थापन मंडळ
जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र तथा
जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

---

जा.क्र.सकवि/जिपउ/दिव्यांगकेंद्र/बैठकइतिवृत्त/841/2023-24
समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद
दिनांक:-28/06/2023

प्रति,

.................................................

.................................................

Scanned with OKEN Scanner